जा.क्र. मसंके/टेटवली–प्रअ/ ४६८ /२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी
दिनांक :– ३०/०८/२०२२

प्रती,

**मा. प्रभारी अधिकारी**
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

विषय :– टेटवली प्रक्षेत्रावरील काजु बागेतील साफ – सफाईची विविध कामे ठेका पध्दतीने करणेबाबत जाहीरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दीस देणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, टेटवली विभागात काजु बागेतील साफ – सफाईची विविध कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. तरी याबाबतची जाहीरात कृपया विद्यापीठाच्या www.dbskkv.org.in या संकेत स्थळावर प्रसिध्दीस देण्यात यावी ही विनंती.

सोबत :– प्रसिध्दी नमुना

आपला विश्वासू

**संचालक**
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता.दापोली, जि. रत्नागिरी

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

## मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी.

जा.क्र./मसंके/टेटवली–प्रअ/४६८/२०२२ दिनांक :– ३०/०९/२०२२

## जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत टेटवली विभागात सन २०२२–२३ या आर्थिक वर्षात प्रक्षेत्रावरील काजु बागेतील साफ – सफाईची विविध कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. त्यासाठी कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल<br>१. क्षेत्र :– १४ हेक्टर १७/१०/२०२२<br>२. झाडांची संख्या :– २७०० २८/०२/२०२३ | मजुरी दर | एकुण रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १. | काजू बागेतील जंगली झाडी – झुडपे तोडणे. व गवत कापणे. | | |
| २. | तोडलेली झाडी – झुडपे व गवत एकत्र गोळा करणे. | | |
| | एकुण | | |

वरीलप्रमाणे प्रक्षेत्रावरील काजु बागेतील साफ – सफाईची विविध कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमती पत्र आणि दरपत्रक नमुना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी/ठेका कामांचे दरपत्रकामध्ये होणाऱ्या मजुरीच्या एकुण रक्कमेचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार कलेल्या नमुना पत्रामध्येच भरून द्यावयाचा आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात **दिनांक :–१०/१०/२०२२** पर्यत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहित दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"टेटवली विभाग अंतर्गत प्रक्षेत्रावरील काजु बागेतील साफ – सफाईची विविध कामे ठेका पध्दतीने करणे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून **मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (टेटवली विभाग)** यांचे नावे पाठवावा. पोस्टाद्वारे होणाऱ्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडण्यात येत असुन त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

## –: अटी व शर्ती :–

१. ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरूप पाहूनच दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.

२. ठेका मजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापसून निमस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख यांनी दिलेल्या सूचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे. दरपत्रकासोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

३. ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना श्रम व रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचा F.No. 1/13(1)/2017-LS-11 दि. १७/३/२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरानुसार वेतन देण्यात येते. असे प्रमाणपत्र ठेक्याने देयक कार्यालयास सादर करते वेळी देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयकासोबत नसल्यास देयकाची अदायगी करण्यात येणार नाही.

४. कामाची अदायगी महीना संपल्यावर किंवा ठेका संपल्यानंतर करण्यात येईल. संबधित देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक /प्रभारी अधिकारी यांचेकडील काम वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील.

५. ठेका अपूर्ण सोडल्यास ठेक्याच्या बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबधित ठेकेदाराचे दरपत्रक पुढील ठेक्याच्यावेळी ग्राहय धरले जाणार नाही.

६. प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधित कार्यालयामार्फत केला जाईल. पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यावर दररोज संबंधितांकडे जमा करावयाचे आहे. औजारे नादुरूस्त झाल्यास दुरूस्तीसाठी होणारा खर्च ठेकेदाराच्या देयकामधून वसूल केला जाईल.

७. प्रक्षेत्रावर दिलेल्या सूचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

८. ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बँक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी एनईएफटी/आरटीजीएस/ धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.

९. ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्यास संबधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

१०. कामाच्या कालावधित ठेकेदार अथवा त्याच्या कामागाराकडून/मजूराकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदारच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किमंत वसुल करण्यात येईल व त्याबाबत ठेकेदारावर कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

११. ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात यईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेला ठेका कोणत्याही वेळी रदद करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

१२. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक एस.एल.पी. ५४५३/९० निर्णयानुसार ठेकेदारास किंवा त्याने नेमलेल्या मजूरास ठेका कालावधीमध्ये /ठेका कालावधीनंतर विद्यापीठ/ शासकीय सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

१३. ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखीत स्वरूपात करणे बंधनकारक राहील. कंपनीने/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

१४. शासनाच्या नियमानुसार ठेकेदाराच्या देयकातुन आयकर कपात करण्यात येईल.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र,वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.

प्रत माहीतीसाठी सादर

१. नोटीस बोर्ड, म. स. के., वाकवली,
२. नोटीस बोर्ड, भासुयो/कंदपिके, म. स. के., वाकवली,
३. ग्रामपंचायत वाकवली/पांगारी/टेटवली/सुकदर